# गरमागरम चिवडा

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**गरमागरम चिवडा : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# गरमागरम चिवडा

# अनुक्रमणिका


- महंमद अल्ली नि हसन निजामी यांची लाथाळी ..... ७
- पत्वाखाली सत्याग्रहाला आठ महिने झाले ..... ११
- शहाबादच्या मुसलमानांची हिंदु होण्याची धमकी ..... १६
- हिंदूंनी मशिदीवरून वाजवावें मअूच्या मुसलमानांचा बनाव ..... २०
- धमकीचीं पत्रें ..... २७
- अरेरे ! नीलच्या पुतळ्याच्या घोड्याचा पाय तोडला ..... ३४
- हाती आलेलीं चार प्रमाणपत्रें ..... ३७
- भरतपूरच्या महाराजांस गादीवरून काढावें... ..... ४२
- शुद्धीच्या नांवाखाली गोमंतकात राजकीय चळवळ... ..... ४७
- तुर्की मुलींना अमेरिकन शाळेत घालू नका ! ..... ५२
- निजामाची तळी अुचलणारे मुसलमान ..... ५६
- संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य ह्या शब्दांनी चिडलेले गांधीजी... ..... ६३
- हुतात्मा अंदमानांत मेले कां नाहीत? ..... ७१
- राष्ट्रीय सभेपेक्षा सर्वपक्षीय सभा मोठी ! ..... ७६
- लालाजींवर लाठीमार ..... ८०
- काशीतील दोन संमेलनें... ..... ८२
- मुंबअीचा दंगा ..... ८७
- नेपाळचा दगडी प्रासाद नि सय्यद अहमदचें काचघर ..... ९४
- हुतात्मा राजपाल आणि महात्मा गांधी ..... १०१
- शंकराचार्य महाराजांची नि जॉनबुल महाराजांची सूचना ..... १०९
- सर टेगार्टच्या दंड्याविरुद्ध चितागांगचा प्रतिदंडा ..... ११४
- ही सूडाची ब्याद किंवा हत्येची ब्याद ..... १२०


✦✦

# महंमद अल्ली नि हसन निजामी यांची लाथाळी

महंमद अल्ली आणि हसन निजामी यांची प्रेक्षणीय लाथाळी दिवसेंदिवस खूपच रंगात येत चालली आहे. परवाच्या डावात तर महंमद अल्लींची लाथ अगदी अचूक निजामींच्या नाकाच्या अगदी बोंडीवर जाअून बसली ! हुतात्मा श्रद्धानंदांच्या हत्येने चिडून काही क्रुद्ध हिंदु हसन निजामी यांची खोड मोडणार आहेत, असा धाक पडून हसन निजामी आजकाल शक्यतोवर आपल्या घराचे किल्ल्यात बसूनच मुसलमानांची काय अुन्नति करिता येअील ती करीत आहेत, ही गोष्ट दिल्लीच्या बाजारात बहुतेकांच्या कानावर आलेलीच होती. पण अल्लींनी ती अुभ्या हिंदुस्थानच्या कानावर घालण्यासाठी परवा निजामीवर प्रकटपणे अुपाधिवर्षाव केला! त्यात त्यांनी खालील पदव्या निजामीसाहेबास अर्पण केल्या. ''सरकारी हेर ! निजामांचे अन्न खाऊन त्यांच्याच विरुद्ध, सरकारकडे चुगल्या करणारा, निमक हराम ! श्रद्धानंदांच्या हत्येनंतर भयभीत होअून घरात दडून बसलेला भ्याड !!!''

या पदवीदानाचा स्वीकार केल्यानंतर अल्लीहून तरी आपण काही अधिक भ्याड नाही हें सिद्ध करण्यासाठी, महंमद अल्ली जसे अबदुल रशीदला बंदिगृहात जाअून भेटून आले तसे निजामीही घराबाहेर पडून बंदिगृहाकडे भेटावयास गेले, पण अर्थात्‌च दहा पांच शरीररक्षकांच्या मंडलात आपला बिनमोल देह स्थापन करून !

०००

श्रद्धानंदांची हत्या हें अेका व्यक्तीचें कृत्य आहे; अशा प्रवृत्तीविषयी मुसलमान समाजासच दोष देअू नका, ही महात्मा गांधींची दिव्यवाणी किती अर्थपूर्ण होती हें प्रथम कोणाकोणास कळलें नव्हतें. ते म्हणाले, 'मुसलमानांची मनोवृत्ति

ओळखण्याइतके गांधीजी चाणाक्ष नाहीत.' पण आता ती त्यांची चूक होती आणि गांधीजींच्या दिव्य दृष्टीस दिसलें तेंच सत्य होते, हें प्रत्यही घडणाऱ्या मुसलमानी घटनांवरून सिद्ध होत आहे ! अुदाहरणार्थ खालील घटना पाहून जाफरअल्ली म्हणाले, 'गाझी रशीदची तलवार मी चुंबिली असती ! –जर आज मुसलमानी राज्य असते!' कलकत्त्याच्या नगरसंस्थेत (म्युनिसिपालिटीत) श्रद्धानंदांच्या मृत्यूविषयी खेद व्यक्त करणाऱ्या ठरावास मुसलमानांनी एकजात अडथळा केला. मिरतच्या मशिदीतून मुसलमानांनी ती हत्येची बातमी अैकताच दीपोत्सव केला. गोरखपूरला मुसलमानांनी मिठाअी वाटली. दिल्लीच्या जुम्मामशिदीत हाजी महंमद अल्लींनी गाझी रशीदला या खटल्यातून निर्दोष होअून सुटता यावें म्हणून सार्वजनिक प्रार्थना केल्या. पेशावरपासून तो महाराष्ट्रातील लहानसहान जिल्ह्यांच्या गावापर्यंत मुसलमानांतून रशीदचा खटला लढविण्यासाठी निधि जमविण्यात आला. कोठेही महत्त्वाच्या अशा मुसलमानांच्या सभा श्रद्धानंदांच्या हत्येविषयी खेद प्रदर्शित करण्यासाठी झाल्या नाहीत. अनेक ठिकाणी हरताळाचे दिवशी मुसलमानांनी आपली दुकानें बंद ठेवण्याचें नाकारिले. मुसलमानांच्या कित्येक प्रमुख पत्रांतून श्रद्धानंदांच्या हत्येविषयी टर अुडविणारे अुद्‌गार काढण्यात आले. अेकाने लिहिलें की, बहुधा श्रद्धानंदजींच्या सेवकाने (ज्याने त्यांचा प्राण वाचविण्याचे कार्यी स्वत:ही घायाळ करून घेतलें त्याने) बहुधा त्यांची हत्या केली असावी आणि मग रशीदला निष्कारण पकडले असावें. दुसऱ्याने लिहिलें, अजी जनाब अैसा नहीं ! 'अेवीतेवी श्रद्धानंद रोगाने मरणारच आहेत असें पाहून त्या रोगाच्या अत्यवस्थ स्थितीत हिंदूंनी विचार केला की, यांना गोळी घालून मारून हुतात्मा कां न करा ! मुसलमानांवर आग पाखडण्यास ही अुत्तम संधि आहे !' आणि हिंदूंनी असा विचार करून श्रद्धानंदास स्वत:च गोळी घालून मारिलें ! जाफरअल्लीने लिहिलें, 'श्रद्धानंद गायीच्या जन्मास आले देखील आणि कोण्या मुसलमानी कसायाच्या खुंट्याशी बांधले देखील गेले असतील !' – आता या कसायाच्या खुंट्याची शपथ आहे, सांगा की श्रद्धानंदास मारणाऱ्या प्रवृत्तीचा सर्व दोष अेका अेकुलत्या व्यक्तीवरच असून त्याविषयी मुसलमान समाजातील मोठ्या भागाला दोषी धरू नका, हे आपल्या या गांधीजींचे मत किती न्यायसंगत आणि सत्य होतें तें ! अगदी चटकन् सत्य तें त्यांच्या दिव्य दृष्टीस दिसून आलें ! अेका क्षणाचाही विचार करावा लागला नाही ! महात्माच तो ! खरा खरा अंतर्ज्ञानी !!



अशा अंतर्ज्ञानी आणि दिव्यदृष्टी पुढाऱ्याचे हाती राष्ट्राचीं सूत्रें सोपवून त्यास 'सर्वाधिकारी' (डिक्टेटर) नेमलें म्हणूनच तर लोकमान्यांचे मृत्यूनंतर अेका चार वर्षात हिंदुस्थानात राजकारण आणि धर्मकारण अितकें रंगारूपास आलें ! जिकडे पहावें तिकडे अेकीच अेकी, अुन्नतिच अुन्नति, तेजच तेज !

केवळ हें हिंदुसंघटन तेवढें, काय मुर्दाडपणा करीत असेल ते असेल ! जर का हें संघटनही मध्ये आलें नसतें तर या 'सर्वाधिकाऱ्याच्या अंतर्ज्ञानाने' प्रेरित झालेल्या या तेजाने आज हिंदुस्थान, निदान हिंदुजाति, स्वत: अुभीची अुभी जळू लागली असती जळू !

०००

मागे अेकदा महंमद अल्ली म्हणाले, 'अिब्न साअूदच्या विरुद्ध जी गाऱ्हाणीं आहेत, तीं खरीं ठरली तर मी स्वत: जाअून अिब्न साअूदच्या विरुद्ध लढत मरेन ! अल्ली तिकडे गेले, गाऱ्हाणी खरीं ठरली. साअूदविरुद्ध लढाअी सुरू झाली पण अल्ली जिवंतचे जिवंत परत आले. त्यांच्यावर दारूगोळा व्यय करण्याअितका रिकामटेकडा शिपाअी अिब्न साअूदच्या सैन्यात कोणीदेखील भेटला नाही. त्यांच्यावर त्यांना मारून टाकण्याचा देखील कोणी अुपकार करीना ! खरोखरच अिब्न साअूदचे लोक मोठे दुष्ट आहेत !

पुढे श्रद्धानंदजींच्या मृत्यूनंतर महंमद अल्ली म्हणाले, 'आता ह्या पापाचें प्रायश्चित्त माझें रक्त सांडून होत असेल तर मी तें आनंदाने करीन.' पण अिब्न साअूदसारख्या दुष्टांची गोष्ट तर दूरच; पण दानशूर म्हणून गाजलेल्या हिंदु लोकांतही कोणी अेवढा अुपकार श्रद्धानंदांचे नांवाने देखील अल्लींवर करीना तेव्हा अल्लींच्या पदरी तेंही पुण्य पडलें नाही !

म्हणून आता चीनच्या विरुद्ध सैन्य धाडण्याचा निषेध करण्यास्तव भरलेल्या अेका सभेत महंमदअल्लींनी सगळ्या जगाला पुन: अेकदा स्वत: मरण्याचा धाक घातला होता ! चीनला जर सैन्य धाडाल तर ज्या आगगाडीने तें जाअील तिच्या रुळावर मी पडेन आणि छातीवरून ती आगगाडी जाअीतो उठणार नाही म्हणून ते गर्जले. रीतीप्रमाणे टाळ्या पडल्या आणि महंमद अल्ली आता मात्र वाचत नाहीत अशी आम्हांस धास्ती पडली. कारण चीनला सैन्य हे जाणारच ! महंमद अल्ली मरणार, आता जगाचें कसें होअील म्हणून अुद्विग्न असता अेकाच पत्रात दोन्ही

बातम्या वाचल्या ! चीनला सैन्य गेलें आणि महंमद अल्लीने जुम्मा मशिदीत हिंदु लोकांस आणि हसन निजामीस शिव्यांची लाखोली वाहिलेलें भाषण केलें ! महंमद अल्लींची मरणाची गाडी तिसऱ्यांदा हुकली ! पण हें झालें कसें हें काही कळेना !

क्वचित् असें झालें असेल की, चीनचें सैन्य आगगाडीत बसून निघतांना हा सत्यप्रतिज्ञ महावीर महंमद अल्ली आगगाडीच्या रुळावर पडण्यास गेला असेल. पण रुळावर न पडता घाऊीघाऊीत रुळांचे मधोमध पडल्याने रुळावरून गाडी निघून गेली तरी त्याचा प्राण काही गेला नाही. मरावें कसें याची देखील माहिती असावी लागते. आता हा तिसरा योग तर गेला. आता पाहू. मरणाचा चौथा डोहाळा महंमद अल्लीस कोणच्या प्रकारचा होतो तो. भीति एवढीच की, लांडगा आला, लांडगा आला ! असें गमतीने म्हणता म्हणता लांडगा खरोखरीच अेखादे वेळी आला नाही म्हणजे झाले?

०००

पंडित मोतीलाल नेहरू व डॉ. किश्चलु आदि कित्येक निस्सीम देशभक्त पुढाऱ्यांनी पुन: वकिली सुरू करण्याचें ठरविलें आहे. ठीकच आहे. वकिली सोडून जो देशोद्धार व्हावयाचा तो झालाच आहे. अेका वर्षात स्वराज्य मिळून पुन: निघून देखील गेलें ! तेव्हा आता ज्यांनी त्यांनी आपापले पोटापाण्याचे अुद्योग पहावे हें साहजिकच आहे. वकिली वाऊीट म्हणून आपण वकिली थोडीच सोडली होती. लोक तिला वाऊीट म्हणत आणि लोकांवाचून पुढारी कोणांचें व्हावयाचें ते कळेना म्हणून वकिली सोडली होती. आता लोक तसे फारसें म्हणत नाहींत आणि वकिली आणि पुढारीपण हे दोन्हीही तीर आपल्या मोठेपणाच्या भात्यात राहू शकतात. तेव्हा आता वकिली सुरू करण्यास काय प्रत्यवाय आहे?

–श्रद्धानंद, दि. ३ मार्च १९२७

✦✦✦



## पत्वाखाली सत्याग्रहाला आठ महिने झाले

पत्वाखालीचा सत्याग्रह आतापर्यंत अगदी नियमाने चालत आलेला आहे. मध्यंतरी सत्याग्रह करण्यासाठी आपले गुरखे बंधूही गेल्याची वार्ता ‘श्रद्धानंदा’त आपण सर्वांनी वाचलीच आहे. शेवटी नम:शूद्र म्हणजे (नामशूद्रांनीही) बंगालमधील आजपर्यंत अस्पृश्यांतील अस्पृश्य गणल्या गेलेल्या आपल्या हिंदु बंधूंनीही या सत्याग्रहास त्यांच्या जातीचे ५ स्वयंसैनिक पाठवून हिंदु जातीच्या झगड्यात आपली स्वत:ची वर्गणी सादर केली. श्रीहरीच्या ध्वजाखाली हिंदुधर्माचे रक्षणार्थ रणक्षेत्रात स्पृश्यांबरोबर जे खांद्यास खांदा लावून झुंजले, त्यांची अस्पृश्यता भस्म झालेली आहे. आता ‘तुम्ही आम्ही सकल हिंदु, बंधु बंधु !’

हा पत्वाखालीचा सत्याग्रह आरंभ होअून आता आठ महिने होत आले. प्रत्यही दहापांच हिंदु स्वयंसैनिकांसह भजनाची मिरवणूक निघते. मशिदीपर्यंत पोंचेतों हरिनामाचे गजराने त्या गावचें वातावरण दुमदुमवून देते आणि अंती सशस्त्र शिपाऊी येअून त्यास धरीपर्यंत स्वयंसैनिक वाद्यें वाजवीत आणि हरिनामाचा घोष करीत मशिदीपुढील राजमार्गाने पुढे घुसतात. लगेच दुसरे दिवशी पुन: दुसरे भजनीवर हाच क्रम पुढे चालवितात. शेकडो तुरुंगांत गेले, अन्नत्याग झाले. मुसलमानी गुंडांचे दंगे झाले, डोकीं फुटलीं, जादा पोलिस बसले, त्यांच्या करासाठी लिलाव पुकारले, गव्हर्नर फणफणले, मुसलमान जळफळले; पण हिंदूंचें हरिकीर्तन आणि सत्याग्रह जशाचा तसा चालू आहे !

मुसलमानांनी नसता दुराग्रह धरिला नसता तर ज्या मशिदीवरून हिंदूंच्या वाद्यांची मिरवणूक वर्षातूनही अेखादे वेळी क्वचितच जाती, त्याच मशिदीवरून तोच दुराग्रह